## मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई.

शुक्रवार दिनांक ८ डिसेंबर १९९५ रोजी झालेल्या मंडळाच्या ३२ व्या बैठकीचा कार्यवृत्तान्त.

---

मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाची ३२ वी बैठक शुक्रवार दिनांक ८ डिसेंबर १९९५ रोजी सकाळी ११.०० वाजता गृहनिर्माण भवन, सभागृह, तिसरा मजला येथे संपन्न झाली.

या बैठकीस पुढील मान्यवर उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १] ॲडव्होकेट श्री. मधु चव्हाण, | सभापती. |
| २] श्री. उपमन्यू चटर्जी, | मुख्य अधिकारी. |
| ३] श्री. एम्. जी. खाबडे, | उपसचिव, महाराष्ट्र शासन, गृ. नि. व वि. स. विभाग, मंत्रालय. |
| ४] श्री. अरविंद रेळे, | सदस्य. |
| ५] श्री. विनोद खोपकर, | -"- |
| ६] श्री. चंद्रकांत विश्वासराव. | -"- |
| ७] श्री. अमोद उसपकर, | -"- |
| ८] श्री. भालचंद्र ठाकूर, | -"- |
| ९] श्री. दगडू सकपाळ, | -"- |
| १०] श्री. देवदास प्रभाकर साटम, | -"- |
| ११] श्री. प्रकाश संपत भूवड, | -"- |
| १२] श्री. दिलीप गोडांबे, | -"- |
| १३] श्री. गणेश तिकोने, | -"- |
| १४] डॉ. विनोद मेहता, | -"- |
| १५] श्री. अभय सावरकर, | -"- |
| १६] श्री. अनंत पालकर, | -"- |
| १७] प्रमुख अभियंता, म. न. पा. ह्यांचे प्रतिनिधी. | |
| १८] उपकर संचालक व निर्धारक, महानगरपालिका. | |

...२/...

सभेच्या सुरुवातीस मा. सभापती, दुवपु यांनी नव निर्वाचित सदस्यांची मुंबई दुरुस्तरत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळावर नियुक्ती झाल्याबद्दल स्वागत करुन त्यांचे अभिनंदन केले. स्वागतपर भाषणात बोलतांना मा. सभापती, दुवपु यांनी उपस्थित सदस्यांना शासनाने त्यांच्यावर सोपविलेल्या जबाबदारीचे महत्व पटवून दिले. त्यांनी सांगितले की, मुंबई बेटावर सुमारे २०,००० जुन्या उपकर-प्राप्त मोडकळीस आलेल्या इमारती आहेत. त्यातील भाडेकरुंच्या घर दुरुस्ती बाबतच्या तक्रारींचे निराकरण करण्याची जबाबदारी आपल्या मंडळावर आहे. तसेच संक्रमण शिबिरात रहात असलेल्या भाडेकरु/रहिवाशांच्या मुलभूत गरजा पुरविण्याची जबाबदारी आपल्यावर आहे. शासनाने जी आपल्यावर जबाबदारी सोपविलेली आहे, त्यामध्ये संबंधित मुख्य अधिकारी, दुवपु व अधिकारी वर्ग यांना पूर्ण विश्वासात घेवून जनतेची कामे पूर्ण करावयाची आहेत. तसेच ज्या विश्वासाने जनतेने आपल्याला येथे बसविलेले आहे, त्या विश्वासास आपण पात्र होवू असे सांगून त्यांनी परत सर्वांचे मन:पूर्वक अभिनंदन करुन सर्व सन्माननीय सदस्यांना पुष्पगुच्छ अर्पण केले, तसेच त्यांनी मुख्य अधिकारी श्री. उपमन्यू चटर्जी, सहमुख्य अधिकारी श्री. झेंडे यांचे सर्व सन्माननीय सदस्यांच्या वतीने स्वागत केले. मा. सभापती यांनी आजच्या बैठकीच्या कामकाजास सुरु करण्यापूर्वी दुरुस्ती मंडळाच्या कार्याची संक्षिप्त माहिती देताना सांगितले की, शासनाने १९६९ मध्ये जेव्हा हा कायदा अंमलात आणला त्यावेळी दुरुस्ती मंडळ हे मुंबई मंडळातच अंतर्भूत होते. आता दुरुस्ती मंडळ हे एक स्वतंत्र घटक असून त्यामध्ये प्रमुख तीन विभाग मोडतात. १] मुंबई बेटावरील जुन्या इमारतींची संरचनात्मक दुरुस्ती करणे, २] ज्या इमारती दुरुस्तीच्या पलिकडे गेलेल्या आहेत त्यांना कलम ८८ [३] "अ" अंतर्गत घोषित करुन त्यांची पुनर्बांधणी करणे, ३] तसेच पुनर्बांधणीच्या कालावधीमध्ये विस्थापीत झालेल्या भाडेकरु/रहिवाश्यांची पर्यायी व्यवस्था संक्रमण शिबिरात करणे, त्या सर्वांवर मुख्य अधिकारी, दुवपु यांचे नियंत्रण असते. नंतर सहमुख्य अधिकारी श्री. झेंडे, उपमुख्य अधिकारी [पु. गा. ] श्री. पोरेड्डीवार, उपमुख्य अधिकारी [सं. गा. ] श्री. जाधव, पुनर्बांधणी विभागाचे उपमुख्य अभियन्ता श्री. शहा, दुरुस्ती विभागाचे उपमुख्य अभियन्ता [उत्तर] श्री. राव, दक्षिण विभागाचे प्रभारी उपमुख्य अभियन्ता श्री. जी. गौडा यांच्या अखत्यारितील कामाची माहिती दिली. तसेच मुख्य अभियन्ता/प्राधिकरण श्री. महाजन यांचे मार्फत तांत्रिक बाबी हाताळल्या जातात. दुरुस्ती विभागाचे मुख्य लेखाधिकारी श्री. मालवणकर हे त्यांच्या अखत्यारितील दुरुस्ती मंडळाच्या वित्त विभागाचे

काम पहातात. तसेच निवासी कार्यकारी अभियन्ता श्री. गद्रे हे दुरुस्ती मंडळांतर्गत जी प्रकरणे येतात, त्यांचे संकलन करणे व पुढील कार्यवाही करणे ही कामे पहातात. तद्नंतर मा. सभापती, दुवपु यांनी उपस्थित सर्व अधिका-यांना आपापल्या विभागाची व आपल्या कामाची माहिती सर्व सन्माननीय सदस्यांना देण्यास सांगितले व त्याप्रमाणे सर्व अधिका-यांनी आपल्या विभागाची व आपल्या कामाची माहिती सर्व सन्माननीय सदस्यांना दिली.

तद्नंतर मा. सभापती, दुवपु यांनी आजच्या बैठकीच्या कामकाजास औपचारिकरित्या सुरुवात केली. मा. सदस्य श्री. देवीदास पाटील यांनी मा. सभापतींचे तसेच मुख्य अधिकारी, मा. सदस्य व उपस्थित अधिकारी वर्ग यांचे आभार मानले. त्यांनी असे प्रतिपादन केले की, आज युतीच्या सरकारने जो कार्यभार आपल्यावर सोपविलेला आहे, विशेष करुन संक्रमण शिबिरातील भाडेकरुंचा प्रश्न तसेच पुनर्बांधणी बाबतच्या भाडेकरुंच्या समस्या सोडविण्याबाबत सर्व अधिकारी वर्गाने पूर्णपणे सहकार्य करावे, जेणे करुन तळागाळातील लोकांचे प्रश्न चांगल्या प्रकारे सोडविता येतील.

चर्चेच्या ओघाओघात बोलताना मा. सदस्य श्री. भालचंद्र ठाकूर यांनी अशी सुचना केली की, मंडळाची सन १९९६ ची दैनंदिनी बनविण्यांत येईल, त्यामध्ये औरंगाबाद बोर्डाच्या ऐवजी संभाजीनगर मंडळ आणि बॉम्बे बोर्डाच्या ऐवजी मुंबई मंडळ अशी दुरुस्ती करावी. यावर खुलासा करताना मा. सभापती यांनी सदर सुचना योग्य असून राजपत्र [गॅझेट] प्रसिध्द केल्यानंतर तशी दुरुस्ती करण्याच्या सुचना संबंधितांना दिल्याचे सांगून आजच्या बैठकीत ठेवण्यांत आलेल्या कार्यसूची बाबत थोडक्यात माहिती सर्व सन्माननीय सदस्यांना दिली.

बाब क्रमांक :- ३२.१

पुनर्रचना विभागातील खालील प्रस्तावांना पुनर्रचित इमारतींना नांव देणेबाबत, पुनर्बांधणी योजना [धोरणात्मक बाब] राबविण्याबाबत, सुधारित प्रशासकीय मंजूरीबाबत, नविन पुनर्बांधणी योजनेस प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत.

....४/...

[अ] पुनर्रचित इमारतीच्या नावास मंजुरी मिळणेबाबत.

१] विषय :- इमारत क्र. १-१७, परमानंद वाडी, फ/द ग. द. आंबेकर मार्ग, परेल येथील पुनर्रचित इमारत क्र. १ साठी नविन नांव देणेबाबत.
-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-

वरील विषयाबाबतची बाब टिप्पणी पृष्ठ क्र. १ वर सादर करण्यांत आलेली आहे. सदर विषयांकित इमारत मंडळामार्फत पुनर्रचित करण्यांत आलेली असून त्यास "सुर्यदर्शन" हे नांव देण्यास मंजूरी देण्याबाबतचा प्रस्ताव आज मंडळासमोर ठेवण्यांत आलेला आहे. सदर प्रस्तावावर चर्चा होवून विषयांकित इमारतीस "सुर्यदर्शन" हे नांव देण्याचे सर्वानुमते ठरले.

२] विषय :- जुनी इमारत क्र. १६सी, जिम्मी चेंबर्स, जगन्नाथ भातणकर मार्ग, परळ, फ/द विभाग, येथील पुनर्रचित इमारतीच्या नावांस मंडळाची मंजूरी मिळणेबाबत.
-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-

वरील विषयाबाबतची बाब टिप्पणी पृष्ठ क्र. ३ वर सादर करण्यांत आलेली आहे. सदर विषयांकित इमारत मंडळामार्फत पुनर्रचित करण्यांत आलेली असून त्यास "चंद्रोदय" हे नांव देण्यास मंजूरी देण्याबाबतचा प्रस्ताव आज मंडळासमोर ठेवण्यांत आलेला आहे. सदर प्रस्तावावर चर्चा होवून विषयांकित इमारतीस "चंद्रोदय" हे नांव देण्याचे सर्वानुमते ठरले.

३] विषय :- सकीनाबाई चाळ २२/२४ बी, सिताराम जाधव मार्ग, लोअर परेल या पुनर्रचित इमारतीच्या नावास मंडळाची मंजूरी मिळण्याबाबत.
-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-

वरील विषयाबाबतची बाब टिप्पणी पृष्ठ क्र. ५ वर सादर करण्यांत आलेली आहे. सदर विषयांकित इमारतीचे काम प्रगती - पथावर असून त्यातील भाडेकरुंनी त्यांच्या समितीमार्फत "दुर्गा निवास"

हे नांव देण्याबाबत विनन्ती केली आहे. त्यानुसार आजच्या बैठकीत सदर इमारतीस "दुर्गा निवास" हे नांव देण्यास मंजूरी देण्याबाबतचा प्रस्ताव आज मंडळासमोर ठेवण्यांत आलेला आहे. सदर प्रस्तावावर चर्चा होवून विषयांकित इमारतीस "दुर्गा निवास" हे नांव देण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक :- ३२/२२६

१] इमारत क्र. १-१७, परमानंद वाडी, ग. द. आंबेकर मार्ग, परेल येथील पुनर्रचित इमारत क्र. १ या इमारतीस "सुर्यदर्शन" हे नांव देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली.

२] जुनी इमारत क्र. १६सी, जिम्मी चेंबर्स, जगन्नाथ भातणकर मार्ग, परळ, फ/द विभाग, येथील पुनर्रचित इमारतीस "चंद्रोदय" हे नांव देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली.

३] सकीनाबाई चाळ, २२/२४ बी, सितराम जाधव मार्ग, लोअर परेल या पुनर्रचित इमारतीस "दुर्गा निवास" हे नांव देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली.

---

[ब] पुनर्रचित योजना राबविण्याबाबत.

[ धोरणात्मक बाब ]

१] विषय :- मसालावाला चाळ साने गुरुजी मार्ग/फ/द विभाग येथील मंडळाच्या पुनर्बांधणी योजनेबाबत.

-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-

विषयांकित मालमत्तेच्या पुनर्बांधणी बाबतचा प्रस्ताव पृष्ठ क्र. ७ ते ९ वर सादर करण्यांत आलेला आहे. मा. सभापती,

...६/..

दुवपु यांनी सदर बाबत संक्षिप्त माहिती देण्यास उपमुख्य अभियन्ता [पुनर्रचना] श्री. शहा यांना सांगितले. यावर बोलताना श्री. शहा यांनी सांगितले की, सदर मालमत्तेवरील जुन्या इमारती तोडून त्या ठिकाणी दोन नवीन पुनर्रचित इमारती बांधण्याचा प्रस्ताव होता. त्यापैकी एक इमारत सन १९७८ मध्ये मंडळामार्फत बांधून त्यात मंडळाने एकूण ९५ गाळे बांधले आहेत. उर्वरित दुस-या इमारतीच्या बांधकामास स्थानिक रहिवाश्यांनी सदर जागा मनोरंजनासाठी मैदान ठेवण्यासाठी मंडळाच्या कामास विरोध दर्शविला. त्यामुळे सदर मोकळा भूखंड मंडळाच्या ताब्यात असूनही पुनर्रचनेचे काम मंडळास अद्याप सुरु करता आले नाही.

यावर चर्चा करतांना, मा. सदस्यांनी मा. सभापतींना विचारले की, अनिवासी गाळे म्हणजे काय? यावर खुलासा करतांना मा. सभापती यांनी सांगितले की, तळ मजल्यावर जी दुकाने असतात त्यांना अनिवासी म्हणतात. एखादी इमारत पाडल्यानंतर/पडल्यानंतर त्यातील जे भाडेकरु म्हणजेच रहिवाशी यांना संक्रमण शिबिरात जागा दिली जाते व जे दुकानदार म्हणजेच अनिवासी त्यांना सदर इमारतीची पुनर्बांधणी होईपर्यन्त तेथेच वास्तव्य करण्याची मुभा दिली जाते.

यावर बोलताना मा. सदस्य श्री. खोपकर यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, सदर मालमत्तेवरील उर्वरित ८ भूखंडांचा ताबा मंडळास दिनांक ११. ७. ७६ पासून मिळालेला आहे. तरी गेली २० वर्षे सदर भूखंडाचा विकास का करण्यांत आला नाही, याबाबत खुलासा करण्यांत यावा. यावर मा. सभापती, दुवपु यांनी उपमुख्य अभियन्ता [पुनर्रचना] श्री. शहा यांना याबाबतची माहिती पुढील बैठकीत सादर करण्यास सांगितले. मा. सभापती यांनी सदर विषयाबाबत स्पष्ट कल्पना दिली की, जी इमारत मंडळाने पुनर्रचित केली आहे त्यातीलच भाडेकरु दुसरी इमारत पुनर्रचित करु देत नाहीत. तरी असे करणे योग्य नाही. कारण आज मंडळाच्या विविध संक्रमण शिबिरामध्ये गेली १५/२० वर्षे ज्यांची इमारत अरुंद भूखंडामुळे, महानगरपालिकेच्या आरक्षणामुळे बाधित झालेल्या आहेत, अशा लोकांच्या इमारती भविष्यात होणार नसल्याने मंडळास जो अतिरिक्त ३. १९२

कार्यवाही
उपमुख्य अभियंता
(पुनर)

चटई क्षेत्र निर्देशांक मिळतो, ज्यामध्ये जे अतिरिक्त गाळे उपलब्ध होतात, त्यात त्याचे पुर्नवर्सन केले जाते. मंडळाने सदर भूखंड मैदानासाठी न ठेवता त्याच्यावर बांधकाम करावे असे स्पष्ट मत व्यक्त केले. यावर बोलताना मा. सदस्य श्री. रेळे यांनी अशी विचारणा केली की, मंडळाच्या अधिका-यांनी सदर स्थानिक लोकांशी संपर्क साधून त्यांचेशी सल्लामसलत केला का? यावर बोलताना मा. सभापती, दुवपु यांनी सांगितले की, सदर भूखंड गेली ३ ते ४ वर्षे पडून असून फक्त तेथील रहिवाश्यांच्या विरोधामुळे मंडळास बांधकाम करता आलेले नाही. जर असे केल्यास सर्वच इमारतींबाबत अशी अडचण येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

यावर उपस्थितांनी सविस्तर चर्चा करुन चर्चेअंती सदर भूखंड ~~भूखंडासंक~~ मैदानासाठी न ठेवता त्यावर मंडळाने पुनर्बांधणी योजना कार्यान्वित करावी असे ठरले.

ठराव क्रमांक :- ३२/२२७.

मसालावाला चाळ साने गुरुजी मार्ग फ/द विभाग येथील नियोजित इमारत 'ब' ची पुनर्बांधणी मंडळामार्फत करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली.

---

२] विषय :- परळ-शिवडी विभागातील भूकर पहाणी क्र. २ वरील "बावला कंपाऊंड" येथील मंडळाच्या नियोजित पुनर्बांधणी योजनेबाबत.

-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-

उपरोक्त विषयाबाबतचा प्रस्ताव पृष्ठ क्र. ११ ते १३ वर सादर करण्यांत आलेला आहे. यावर बोलताना मा. सभापती, दुवपु यांनी असे सांगितले की, सदर मालमत्ता ही मंडळाने सन १९७७ साली "भारतीय विद्या भवन" या संस्थेकडून पुनर्बांधणीच्या उद्देशाने

विकत घेतली आहे. आता सदर मालमत्तेवरील ~~काही~~ भाडेकरू सदर मालमत्तेचा पुनर्विकास त्यांच्या सहकारी संस्थेमार्फत करण्यासाठी मागत आहेत. याबाबत स्पष्ट करताना मा. सभापती, दुवपु यांनी सांगितले की, सदर मालमत्तेची पुनर्बांधणी जर भाडेकरूंनी केलीतर त्यांना १.३३ चटई क्षेत्र निर्देशांकानुसार बांधकाम क्षेत्रफळ मिळेल, कारण सदर मालमत्ता ही बिन उपकरप्राप्त आहे. त्यामुळे सदर संस्था सर्व रहिवाश्यांना सामावून घेणे शक्य नाही. जर ह्या मालमत्तेची मंडळाने पुनर्बांधणी केलीतर मंडळास शासनाच्या धोरणानुसार ३.१९२ चटई क्षेत्र निर्देशांक मिळेल व त्यात काही अतिरिक्त गाळे उपलब्ध होतील. तरी आज हा प्रस्ताव मंडळामार्फत पुनर्बांधणी करण्यास मंजूरी देण्यासाठी आपल्या समोर सादर करण्यांत आलेला आहे. सदर प्रस्तावाबर साकल्याने विचारविनिमय करून सर्वानुमते विषयांकित मालमत्तेची पुनर्बांधणी मंडळामार्फतच करण्याचे ठरले.

ठराव क्रमांक :- ३२/२२८.

परळ-शिवडी विभागातील भूकर पहाणी क्र. २ वरील "बावला कंपाऊंड" येथील मंडळाच्या नियोजित पुनर्बांधणी योजना कार्यान्वित करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली.

============

[क]सुधारित प्रशासकिय मंजूरी मिळणेबाबत.

१] विषय :- इमारत क्र. १० बी.सी.डी. कुंभारचाळ, फितवाला रोड "ग" [दक्षिण] विभाग, मुंबई.

-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-

सदर विषयाबाबतची टिप्पणी पृष्ठ क्र. १५ ते २३ वर सुधारित प्रशासकीय मंजूरीसाठी सादर करण्यांत आलेली आहे.

सदर प्रस्तावावर चर्चा करतांना मा. सदस्य श्री. देवदास ~~पाटील~~ साटम यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, सदर कामासाठी सन १९९२ मध्ये ३५.७० लाखाची प्रशासकिय मंजूरी देण्यांत आली होती व आता ६४.४३ लाखाची मंजूरी देण्याचे प्रस्तावित आहे. गेल्या ३ वर्षांत तीनपट वाढ झाल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. तरी ही वाढ होण्याची कारणे काय? यावर खुलासा करताना प्रभारी कार्यकारी अभियन्ता श्री. पालीवाल यांनी सांगितले की, सुरुवातीस जेव्हा सदर इमारतीचे अंदाजपत्रक बनविण्यांत आले होते तेव्हा पाईल फाऊंडेशनची तरतूद करण्यांत आली होती, परन्तू इमारत तोडल्यानंतर जेव्हा जमिनीच्या कसाची तपासणी करण्यांत आली, तेव्हा त्या आधारे दिलेल्या अभिप्रायानुसार सदर जागेवर ओपन फाऊंडेशन करावे लागेल. त्यामुळे १००/- रू. प्रती चौ. फूट वाढले. तसेच गेल्या ३ वर्षात बांधकामाच्या साहित्यात झालेली वाढ या सर्वांमुळे सदर अंदाजपत्रकात वाढ झालेली आहे. तसेच त्यांनी पुढे सांगितले की, पूर्वी पुनर्बांधणीचा प्रती चौ. मी. खर्च १९०० घेण्यांत येत होता. तद्नंतर तो दर ३,००० पर्यन्त करण्यांत आला आणि सद्य:स्थितीमध्ये सदर दर ५,००० प्रती चौ. मि. आहे.

यावर बोलताना मा. सदस्य श्री. दिलीप गोडांबे यांनी अशी विचारणा केली की, प्रत्येक पुनर्बांधणीच्या कामात पाईल फाऊंडेशनची गरज का भासते? यावर खुलासा करतांना श्री. पालिवाल यांनी सांगितले की, जेव्हा इमारत तोडण्यांत येते तेव्हा जागा मंडळाच्या ताब्यात आलेली नसल्याने तेथील तळ मजला तसाच ठेवण्यांत येतो. काही वेळा इमारतीतील रहिवाशी संक्रमण शिबिरात जाण्यास उत्सुक नसतात, अशा वेळी अंदाजानुसार किंवा पूर्वी सदर परिसरात झालेल्या कामाच्या आधारे अंदाजपत्रक बनविले जाते. यावर बोलताना श्री. गोडांबे म्हणाले की, जेथे इमारत अस्तित्वात असते, त्या इमारतीतील चौकामधील जागेत पाईल फाऊंडेशनची तपासणी करण्यांत यावी किंवा याबाबत काय उपाययोजना करता येईल याची पडताळणी करावी.

वरील चर्चेच्या अनुषंगाने मार्गदर्शन करताना मा. सभापतींनी सर्व सन्माननीय सदस्यांचे म्हणणे ऐकून घेवून संबंधित उपमुख्य अभियन्ता

[पुनर्र. ] यांना अशा सुचना दिल्या की, मंडळामार्फत ज्या पुनर्बांधणी योजना अंमलात आणल्या जातात त्यांची अंदाजपत्रके बनविण्याचे नॉर्मस् काय आहेत याची माहिती इतर पुनर्बांधणीच्या माहितीसहीत अहवाल तसेच पाईल फाऊंडेशन व ओपन फाऊंडेशन या बद्दल वेगवेगळी अंदाजपत्रके देणे शक्य होईल किंवा कसे याबद्दलचा अहवाल पुढील बैठकीमध्ये सादर करण्यांत यावा. तद्नंतर सविस्तर चर्चेअंती विषयांकित पुनर्बांधणी योजनेच्या सुधारित अंदाजपत्रकाच्या अंदाजित रक्कम रू. ६४.४३ लाख [भूसंपादनासहित] यास मंजूरी देण्याचे ठरले.

प्रकरण 3531 (५९१८)

---

[२] विषय :- इमारत क्र. ९३ ड सिताराम जाधव मार्ग या इमारतीच्या पुनर्बांधणी योजनेत [मुंबई भूकर क्र. २/१५८ [भाग] लोअर परेल विभाग] सुधारित प्रशासकीय मंजूरीसाठी पाठवावयाच्या प्रस्तावास मान्यता मिळण्याबाबत.

-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-

सदर विषयाबाबतची बाब टिप्पणी पृष्ठ क्र. २५ ते ४१ वर सादर करण्यांत आलेली आहे. सदर प्रस्तावावर बोलताना मा. सभापती, दुवपु यांनी सांगितले की, विषयांकित मालमत्तेच्या पुनर्बांधणी योजनेच्या सुधारित अंदाजपत्रकास रू. ५२.८५ लाख [भू-संपादनासहित] सुधारित प्रशासकीय मंजूरी मिळण्याबाबत प्रस्ताव सादर करण्यांत आला आहे. सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चा होवून सर्वानुमते ~~मान्यता देण्यांत आली.~~ सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचे ठरले.

---

[३] विषय :- इमारत क्र. बारा, चाळ क्र. ४, ६, ७, सनमील लेन, [सिताराम जाधव मार्ग], दक्षिण विभाग, लोअर परेल, [मुं. भू. क्र. १५३[पाई] इमारतीच्या पुनर्बांधणी योजनेस सुधारित प्रशासकीय मंजूरीसाठी पाठवावयाच्या प्रस्तावास मान्यता मिळणेबाबत.

-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-

...११/..

या विषयाबाबतची बाब टिप्पणी पृष्ठ क्र. ४३ ते ५५ वर सादर करण्यांत आलेली आहे. सदर प्रस्तावाबाबत बोलताना मा. सभापती, दुवपु यांनी सांगितले की, सदर इमारतीच्या पाईल फाऊंडेशनचे काम जवळ जवळ संपत आलेअसून ज्योत्यावरील कामामध्ये होणारी संभाव्य वाढ लक्षातघेवून त्याच्या जास्तीच्या होणा-या ~~[illegible]~~ [illegible] एवढया खर्चास सुधारित प्रशासकीय मंजूरी देण्या-साठी प्रस्ताव सादर करण्यांत आलेला आहे. त्यांनी सन्माननीय सदस्यांना पुढे असेही सांगितले की, सदर योजना ही मा. सभापती श्री. दत्ताजी नलावडे यांचे मतदार संघातील आहे.

सदर प्रस्तावावर ~~[illegible]~~ [illegible] सदस्यांनी सविस्तर चर्चा केल्यावर विषयांकित मालमत्तेच्या सुधारित अंदाजपत्रकाच्या रु. 300.30 लाख एवढया रक्कमेस सुधारित प्रशासकीय मंजूरी देण्याचे ठरले.

---

[४] विषय :- इमारत क्र. ५०, अे.बी.सी. सितराम जाधव मार्ग, [सन मिल लेन], चांदीवाला चाळ, ग/दक्षिण विभाग, लोअर परेल. [ मुंबई भूकर क्र. २१८ लोअर परेल विभाग] सुधारीत प्रशासकीय मंजूरीसाठी पाठबा-वयाच्या प्रस्तावास मान्यता मिळण्या-बाबत. ]

-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-

या विषया बाबतची बाब टिप्पणी पृष्ठ क्र. ५७ ते ६५ वर सादर करण्यांत आलेली आहे. सदर प्रस्तावावर चर्चा करतांना मा. सभापती, दुवपु यांनी सांगितले की, सदर इमारतीचे पाईल फाऊंडेशनचे काम जवळ जवळ संपत आलेअसून ज्योत्यावरील काम लवकरच सुरु होणार आहे व ते काम २० महिन्यात पूर्ण करावयाचे आहे. तरी सदर कामाची अंदाजपत्रके तयार करण्यापूर्वी जास्तीच्या होणा-या खर्चास सुधारित प्रशासकीय मंजूरी घेणे जरुरीचे आहे व त्यासाठी आजचा प्रस्ताव सादर करण्यांत आलेला आहे. सविस्तर चर्चेअंती सदर प्रस्तावास सर्वानुमते मंजूरी देण्याचे ठरले.

---

[५] विषय :- इमारत क्र. १२२-१२४-१२६ खोजा चाळ करीरोड, या इमारतीच्या पुनर्बांधणी योजनेत [मुंबई भूकर क्र. १८६ लोअर परेल विभाग] सुधारित प्रशासकीय मंजूरीसाठी पाठवावयाच्या प्रस्तावास मान्यता मिळण्याबाबत...
-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-

सदर विषयाबाबतची बाब टिप्पणी पृष्ठ क्र. ६७ ते ८१ वर सादर करण्यांत आलेली आहे. सदर प्रस्तावावर चर्चा करतांना मा. सभापती, दुवपु यांनी सांगितले की, पूर्वी सदर प्रस्तावाच्या अंदाजपत्रकास प्रशासकिय मंजूरी १९८८ साली देण्यांत आली होती. तेव्हा प्रती चौ. मि. दर हा १९००/- रू. एवढा होता. आता १९९५ साली सदर दर ५८००/- रू. प्रती चौ. मि. झालेला आहे. त्यामुळे सदर अंदाजपत्रकास सुधारित प्रशासकिय मंजूरी घेणे जरूरी आहे. तसेच त्यांनी पुढे असे प्रतिपादन केले की, अंदाजपत्रकात जी वाढ होते ती बांधकाम साहित्यात वेळोवेळी होणारी वाढ, मजूरांच्या मजूरीत होणारी वाढ, तांत्रिक दृष्टया काही फेरबदल केल्यामुळे अंदाजपत्रकात वाढ होते, त्याचे स्पष्टीकरण सुधारित अंदाजपत्रकासोबत दिलेले असते. तरी सन्माननीय सदस्यांनी हया सर्व बाबींचा विचार करून सदर प्रस्तावास मंजूरी देण्यासाठी प्रस्ताव बैठकीसमोर सादर करण्यांत आलेला आहे. सविस्तर चर्चेअंती सदर प्रस्तावाच्या अंदाजित ३६६.४६ लाख [भूसंपादनासहित] रक्कमेस प्रशासकिय मंजूरी देण्याचे ठरले.

---

[६] विषय :- इमारत क्र. ११८ एल करीरोड या इमारतीच्या पुनर्बांधणी योजनेत [मुंबई भूकर क्र. १/१९३ लोअर परेल विभाग] सुधारित प्रशासकीय मंजूरीसाठी पाठवावयाच्या प्रस्तावास मान्यता मिळण्याबाबत..
-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-

....१३/..

सदर विषयाबाबतची बाब टिप्पणी पृष्ठ क्र. ८३ ते ९१ वर सादर करण्यांत आलेली आहे. सदर प्रस्तावाबाबत मा. सभापती, दुवपु यांनी सांगितले की, सदर मालमत्तेचा ताबा मंडळाने जून ९५ मध्ये जिल्हाधिकारी यांचेकडून घेतला आहे. तसेच सदर कामास सन १९८८ मध्ये १९.५९ लक्ष रक्कमेस प्रशासकिय मान्यता देण्यांत आली होती. आता सदर मालमत्तेच्या कामास सुरुवात करावयाची असल्याने त्यास सुधारीत मान्यतेची जरुरी आहे. त्याकरिता सदर प्रस्ताव आजच्या बैठकीस मान्यतेसाठी सादर करण्यांत आला आहे.

सदर प्रस्तावाबर सन्माननीय सदस्यांनी सविस्तर चर्चा करुन ५९.८० लक्ष रक्कमेस सुधारित प्रशासकिय मंजूरी देण्याचे ठरले.

---

[७] विषय :- शिव कोळीवाडा येथील संक्रमण शिबिर क्र. २ [प्रथम टप्पा] पुनर्विकास करणे. या योजनेस सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत.

-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-

उपरोक्त विषयाबाबतची बाब टिप्पणी पृष्ठ क्र. ९३ ते १०७ वर सादर करण्यांत आलेली आहे. उपरोक्त प्रस्तावाबाबत बोलताना मा. सभापती, दुवपु यांनी सांगितले की, सदर संक्रमण शिबिरामध्ये ज्या बैठया चाळी आहेत, त्या तोडून तेथे नविन बहुमजली इमारती बांधण्यांत येणार आहेत, ज्यामुळे जास्तीत जास्त गाळ्यांची व्यवस्था होवू शकेल. सदर प्रस्ताव पूर्वीच्या मंडळाच्या बैठकीमध्ये ठेवण्यांत आला होता, परन्तू निधी अभावी त्यास मंजूरी देण्यांत आली नाही. मा. सभापती यांनी पुढे असेही सांगितले की, निधी बाबत सन्मा. अर्थमंत्री यांची भेट घेतली असून त्यांनी त्यांना ९ कोटी देण्याचे मंजूर केले आहे. ह्याबाबत चर्चा करताना मा. सदस्य श्री. विश्वासराव

यांनी सांगितले की, आपण बहुमजली इमारती बांधत आहात, परन्तू तेथे रहाणा-या भाडेकरूंच्या नागरी सुविधांची पूर्णपणे काळजी घेतली जात नाही. त्यांच्या माहिती मधील सदर संक्रमण शिबिरामध्ये शाळेसाठी म्हाडाने भूखंड राखून ठेवलेला आहे. परन्तू अजूनपर्यन्त तो महानगरपालिकेस हस्तांतरीत केलेला नाही. याबाबत मा. सभापती यांनी संबंधित अधिका-यांना खुलासा करण्यास सांगितले. यावर खुलासा करताना प्रभारी कार्यकारी अभियन्ता श्री. पालीवाल यांनी सांगितले की, पूर्वी सदर संक्रमण शिबिरामध्ये महानगरपालिकेची शाळा चालत होती. तद्नंतर सदर चाळी तोडून तेथे बहुमजली इमारती बांधण्याचे प्रस्तावित करण्यांत आले होते. त्यांचे नकाशे मंजूर करताना महानगरपालिकेने अशी अट घातली की, प्रथम म्हाडाने शाळा बांधून द्यावी, नंतर ते नकाशे मंजूर करतील. परन्तू म्हाडा शाळा बांधून देत नसल्याने त्यांना मोकळा भूखंडही देवू केला होता. आता सदर प्रस्तावावर कार्यवाही चालू आहे. यावर बोलताना मा. सभापती यांनी असे निदर्शनास आणून दिले की, शाळा बांधणे हे मंडळाचे काम नाही, मंडळ उपकरप्राप्त इमारतींची दुरुस्ती व पुनर्बांधणीचे काम करते. तसेच त्यांनी सांगितले की, सदर भागात शाळेची तरतूद करण्यांत आलेली आहे.

चर्चेच्या ओघाओघात सदर प्रस्तावाबाबत सन्मा. सदस्य श्री. उसपकर यांनी अशी सुचना केली की, महानगरपालिका शाळा बांधण्यास तयार नाही व म्हाडा त्यांना बांधून देत नाही, अशा वेळी मुंबई शहरामध्ये अशा पुष्कळ चांगल्या संस्था आहेत, तर त्यांच्या कडून खुल्या निविदा मागवून त्यांना देण्यास काय हरकत आहे. यावर मा. सभापती यांनी सांगितले की, त्यांची सुचना स्विकाहार्य आहे, तरी त्यांच्याकडे असा प्रस्ताव असल्यास त्यांनी तो मुख्य अधिकारी, दुवपु यांना सादर करावा. जेणे करून त्यावर विचार करता येईल.

मा. सदस्य श्री. खोपकर यांनी मा. सभापतींच्या असे निदर्शनास आणून दिले की, मंडळाच्या चालढकल कामामुळे सदर पुनर्बांधणीच्या कामास विलंब झाला. याबाबत खुलासा करतांना

श्री. पालीवाला यांनी सांगितले की, सदर योजनेतील चाळी तोडून तेथे पुनर्बांधणी योजना कार्यान्वित करण्याचे प्रस्तावित आहे. संक्रमण शिबिरामधील चाळीमध्ये/ज्या मोडकळीस आलेल्या इमारतीतील भाडेकरूंची पर्यायी व्यवस्था केली जाते, [illegible] ~~[illegible]~~ कोर्टामधून स्थगिती आदेश आणतात, अशा वेळी सदर चाळी खाली करण्यास विलंब होतो व पर्यायाने ~~सदर~~ योजनेस विलंब होतो.

सविस्तर चर्चेअंती विषयांकित प्रस्तावाच्या प्रथम टप्प्यातील उर्वरित ७ इमारतींच्या पायथ्याच्या कामासाठी अंदाजित रू. १.४६ कोटी आणि ज्योत्यावरील बांधकामासाठी अंदाजित रू. ४.९२ कोटी खर्च येणार [illegible] ~~येत असल्यास शासनाकडून मंजूर होणाऱ्या निधीस अधिन राहून मंजूरी देण्याचे ठरले.~~ [illegible] रु. १३.६२ कोटी [illegible] ठरले.

---

[८] विषय :- शिवकोळीवाडा येथील चाळ क्र. बी-१ ते बी-७, बी-२८ ते बी-३२, सी-६४, ६५ चा पुनर्विकास करणे या योजनेस सुधारित प्रशासकिय मान्यता मिळणेबाबत.

-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-

सदर विषयाबाबतची बाब टिप्पणी पृष्ठ क्र. १०९ ते ११९ वर सादर करण्यांत आलेली आहे. सदर प्रस्तावावर चर्चा करताना मा. सभापती यांनी सांगितले की, सदर प्रस्ताव पूर्वी मंडळाच्या बैठकीमध्ये मंजूरीसाठी सादर करण्यांत आला होता, परन्तू निधीच्या अभावी त्यास मंजूरी देण्यांत आली नाही. तरी शासन देत असलेल्या निधीमध्ये सदर काम करावयाचे असल्यामुळे सदर प्रस्ताव आजच्या बैठकीत मंजूरीसाठी ठेवण्यांत आला आहे. सदर योजनेमुळे पूर्वी असलेल्या १४३ गाळयापोटी नविन नियोजित इमारतीमध्ये ४३२ गाळे निर्माण होणार आहेत व त्यासाठी ज्योत्याखालील बांधकामास तसेच ज्योत्यावरील बांधकामास म्हणून एकूण अंदाजे ६.७७ कोटी रक्कम लागणार आहे. तरी सदर रक्कमेस प्रशासकीय मंजूरी देण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यांत आला आहे.

32

[६] इमारत क्र. ११८ एल करिरोड या इमारतीच्या पुनर्बांधणी योजनेस ५९.८० लाख [भूसंपादनासहित] सुधारित प्रशासकिय मंजूरीस मान्यता देण्यांत आली.

[७] शिवकोळीवाडा येथील संक्रमण शिबिर क्र. २ [प्रथम टप्पा] पुनर्विकास करणेबाबत अंदाजित रु. ९३.१३ कोटी रक्कमेस शासनाकडून मंजूर होणा-या निधीस अधिन राहून मंजूरी देण्यांत आली.

[८] शिवकोळीवाडा येथील चाळ क्र. बी-१ ते बी-७, बी-२८ ते बी-३२, सी-६४, ते ६५ च्या पुनर्विकास योजनेस अंदाजे रु. ६.७७ कोटी रक्कमेस शासनाकडून मंजूर होणा-या निधीस अधिन राहून मंजूरी देण्यांत आली.

===========

चर्चेच्या ओघाओघात मा. सदस्य श्री. देवदास पाटील यांनी मा. सभापती यांना अशी बिनन्ती केली की, बैठकीची कार्यसूची कमित-कमी १० दिवस अगोदर मिळाल्यास त्यावर योग्य प्रकारे अभ्यास करुन विचारविनिमय करता येईल. ह्याबाबत मा. सभापती, दुबपु यांनी सांगितले की, यापुढे बैठकीची कार्यसूची कमितकमी सात दिवस तरी अगोदर देण्याची व्यवस्था करण्यांत येईल.

तसेच मा. सदस्य श्री. खोपकर यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, आपण जी संक्रमण शिबिरे बांधत आहोत, त्यामध्ये होणा-या घुसखोरीस अगोदर आळा बसला पाहिजे. मंडळाच्या विविध संक्रमण शिबिरात होणारी घुसखोरी थांबविण्याबाबत काय उपाययोजना करण्यांत येत आहे. यावर बोलताना मा. सभापती यांनी सांगितले की, सदर बाब उपमुख्य अधिकारी [सं. गा.] श्री. जाधव हे पहातात. ते आजच्या बैठकीस उपस्थित नाहीत. याबाबत मा. सभापती, दुबपु यांनी मुख्य अधिकारी, दुबपु यांचेकडे तिव्र नाराजी व्यक्त करुन त्यांना सांगितले की, आज मंडळाची पहिली बैठक आहे, तरी श्री. जाधव हे

...१८/...

बैठकीस हजर असणे आवश्यक होते. कारण संक्रमण शिबिराबाबत पुष्कळ लोकांच्या तक्रारी आहेत. तरी आपण सदर बाबतची चौकशी करुन योग्य ती कार्यवाही करावी. त्यास मुख्य अधिकारी, दुवपु यांनी संमती दर्शविली.

==========

[ड] प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

[१] विषय :- इमारत क्र. ४१ बी ते ४१ एच "बदक चाळ" [समर्थ हनुमान पथ] डॉ. आंबेडकर रोड, काळाचौकी "ई" विभाग येथील पुनर्रचना योजनेस प्रशासकीय मंजूरी मिळण्याबाबत.

-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-

सदर विषयाबाबतची बाब टिप्पणी पृष्ठ क्र. १२१ ते १५५ वर सादर करण्यांत आलेली आहे. सदर प्रस्तावावर चर्चा करताना मा. सभापती, दुवपु यांनी सांगितले की, सदर इमारतीची पुनर्बांधणी केल्यावर जुन्या भाडेकरुंना पुनर्वसित केल्यानंतर मंडळास २४ गाळे अतिरिक्त उपलब्ध होणार आहेत. तरी सदर प्रस्ताव मंजूरीसाठी सादर करण्यांत आलेला आहे. यावर चर्चा करतांना माननीय सदस्य सर्वश्री सकपाळ व साटम यांनी असे सुचविले की, शासनाने झोपडपट्टी-वासियांच्या पुनर्विकासाबाबत २२५ चौ. फूट गाळे देण्याचे धोरण स्विकारलेले आहे. तसेच मंडळाचे सुध्दा २२५ चौ. फू. गाळे देण्याचे धोरण आहे. तरी त्यादृष्टीने हया पुढील अंदाजपत्रके बनविताना तशी तरतुद करण्यांत यावी असे वाटते. यावर बोलताना मा. सभापती, दुवपु यांनी सांगितले की, मा. मुख्यमंत्री व गृहनिर्माण मंत्री यांनी विधी मंडळात तसेच विविध कार्यक्रमात याबाबत घोषणा केलेली आहे. हया बाबत मंडळामार्फत लवकरात लवकर कार्यवाही होण्याबाबत पाठपुरावा सुरु आहे. तसेच त्यांनी पुढे असे अवगत करुन दिले की, २२५ चौ. फू. चे गाळे बांधल्यावर आज जे मंडळास अतिरिक्त गाळे उपलब्ध होतात, त्यात घट निर्माण होणार आहे. तरी शासनाला अशी विनन्ती

करण्यांत येत आहे की, मंडळास जो ३.१९२ चटई क्षेत्र निर्देशांक मिळतो तो ४.०० चटई क्षेत्र निर्देशांक मिळावा तसेच घर मालक व भाडेकरु यांच्या नियोजित सोसायटीच्या प्रकरणांना सध्या जो २.०० चटई क्षेत्र निर्देशांक मिळतो आहे, त्या ऐवजी २.७५ मिळावा व त्याबद्दल कार्यवाही चालू आहे. त्यांनी सन्माननीय सदस्यांना त्यांची सुचना स्वागतार्ह असून सदर बाबत शासनाकडून योग्य आदेश मिळाल्यानंतर नियोजित इमारतीमध्ये तशी सुधारणा करण्यांत येईल, असे सांगितले.

सविस्तर चर्चेअंती विषयांकित मालमत्तेच्या पुनर्विकासाच्या योजनेसाठी ३४७.७३ लक्ष एवढया रक्कमेस प्रशासकिय मंजूरी तसेच म्हाडा अधिनियम कलम ४१ [१] अन्वये भूसंपादन करण्यासाठीच्या प्रस्तावास मंजूरी देण्याचे ठरले.

=========

~~सविस्तर चर्चेअंती~~

[२] विषय :- जुनी इमारत क्र. ७०, कमलाबाई दादरकर चाळ, व ७२, रेवाबाई गुजराती चाळ, भूकर क्र. ३०२, व ३०३ परळ-शिवडी विभाग, फ/द विभाग, मुंबई येथील पुनर्बांधणी योजनेस प्रशासकिय मान्यता मिळणेबाबत.

सदर विषयाबाबतची बाब टिप्पणी पृष्ठ क्र. १५७ ते १६७ वर सादर करण्यांत आलेली आहे. याबाबत माहिती देताना मा. सभापती, दुवपु यांनी सांगितले की, सदर योजनेतून मंडळास २८ अतिरिक्त गाळे उपलब्ध होणार आहेत. ज्यांचा उपयोग गेली १० ते १५ वर्षे संक्रमण शिबिरात रहाणा-या भाडेकरुंना कायम स्वरूपी पर्यायी जागा देण्यासाठी होणार आहे. तरी सदर प्रस्ताव सन्माननीय सदस्यांच्या मान्यतेसाठी सादर करण्यांत आला आहे. सदर प्रस्तावावर चर्चा होवून सविस्तर चर्चेअंती अंदाजे रु. ७२.६७ लक्ष एवढया रक्कमेस प्रशासकिय मान्यता देण्याचे ठरले.

...२०/..

ठराव क्रमांक :- ३२/२३०

[१] इमारत क्र. ४१ बी ते ४१ एच "बदक चाळ" [समर्थ हनुमान पथ] डॉ. आंबेडकर रोड, काळाचौकी "ई" विभाग येथील पुनर्रचना योजनेसाठी ३४७.७३ लक्ष एवढया रक्कमेस प्रशासकिय मंजूरी व तसेच म्हाडा अधिनियम कलम ४१ [१] अन्वये भूसंपादन करण्यासाठीच्या प्रस्तावास मंजूरी देण्यांत आली.

[२] जुनी इमारत क्र. ७०, कमलाबाई दादरकर चाळ, व ७२, रेवाबाई गुजराती चाळ, भूकर क्र. ३०२, व ३०३ परळ-शिवडी विभाग, फ/द विभाग, मुंबई येथील पुनर्बांधणी योजनेस अंदाजे रु. ७२.६७ लक्ष एवढया रक्कमेस प्रशासकिय मान्यता देण्यांत आली.

==========

बाब क्रमांक :- ३२.२

विषय :- उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्ती कामाच्या अंदाजपत्रकांना दिलेल्या प्रशासकीय मंजूरीबाबत.
-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-

सदर विषयाबाबतची बाब टिप्पणी पृष्ठ क्रमांक १६९ ते १७१ वर सादर करण्यांत आलेली आहे. सदर प्रस्तावावर चर्चा करतांना मा. सभापती, दुवपु यांनी सांगितले की, जेव्हा नविन मंडळ अस्तित्वात नव्हते, तेव्हा प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये मा. सभापती/दुवपु, मुख्य अधिकारी/दुवपु, मुख्य अभियन्ता/प्राधिकरण यांची समिती गठीत करण्याचा निर्णय घेण्यांत आला. सदर समितीने जुन्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या अंदाजपत्रकांना मंजूरी देण्याचे ठरले. तद्नुसार दिनांक २८.११.९५ च्या बैठकीत ज्या इमारतींना तातडीने दुरुस्ती आवश्यक होती अशा दक्षिण परिमंडळातील

...२१/..

व उत्तर परिमंडळातील मिळून एकूण २१७ दुरुस्ती कामाच्या अंदाजपत्रकांना मंजूरी देण्यांत आली. त्यांचा अहवाल सन्मा. सदस्यांच्या अवलोकनार्थ आजच्या बैठकीत सादर करण्यांत आला आहे.

यावर बोलताना मा. सदस्य श्री. खोपकर यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, शासनाने दुरुस्ती मंडळाच्या सदस्यांची दिनांक १६.११.९५ रोजी नियुक्ती केली व २८.११.९५ ला आपल्या समितीने दुरुस्तीच्या अंदाजपत्रकांना बैठक घेवून मंजूरी दिली. याबाबत कुठल्याही सदस्यांना पूर्व कल्पना देण्यांत आली नव्हती. तरी सन्मा. सदस्यांची नेमणूक झाली आहे, हें संबंधित अधिका-यांना माहित नव्हते का? यावर खुलासा करताना मा. सभापती, दुवपु यांनी सांगितले की, शासनाने सन्मा. सदस्यांची दुरुस्ती मंडळावर नियुक्त करण्या अगोदरच ही बैठक ठरविण्यांत आली होती. तसेच शासनाने नियुक्ती केल्यानंतर लेखी आदेश वेळेवर प्राप्त झाले नाहीत. त्यांनी पुढे असेही प्रतिपादन केले की, जरी दुरुस्ती अंदाजपत्रकांना मंजूरी दिलीतरी प्रत्यक्ष काम सुरु होण्यास सर्व कार्यालयीन बाबींची पूर्तता केल्यावरही एक महिन्याच्यावर कालावधी लागतो. हया सर्व बाबींचा विचार करुन कामाची निकड लक्षातघेवून सदर कामाच्या अंदाजपत्रकांना मंजूरी दिलेली आहे व त्या बाबतची माहिती बैठकीत सादर करण्यांत आलेली आहे. यावर सन्मा. सदस्य श्री. अरविंद रेळे यांनी मा. सभापती, दुवपु यांना अशी विनन्ती केली की, ज्या कामांना सदर समितीने मंजूरी दिलेली आहे, त्या कामांची यादी सदस्यांना देण्यात यावी. त्यांची मागणी मान्य करुन मा. सभापतींनी संबंधित उपमुख्य अभियन्ता [दक्षिण] व [उत्तर] यांना याबाबत योग्य ते आदेश दिले.

==========

बाब क्रमांक :- ३२.३

विषय :- मुंबई शहरातील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीकरिता, दुरुस्ती खर्चाची मर्यादा रु.७५०/- प्रति चौ.मी. वरुन रु.१०००/- प्रति चौ.मी. पर्यन्त वाढविण्याबाबत.

-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-

सदर विषयाबाबतची बाब टिप्पणी पृष्ठ क्र.१७३ ते १८१ वर सादर करण्यांत आलेली आहे. सदर प्रस्तावावर चर्चा करतांना मा. सभापती, दुवपु यांनी उपस्थित सन्मा. सदस्यांच्या असे निदर्शनास आणून दिले की, दुरुस्तीची खर्चाची मर्यादा रु.७५०/- प्रति चौ.मी. एवढी सन १९९२ मध्ये वाढविण्यांत आली होती. तदनंतर बांधकामाच्या ~~वाढलेला बाजारभाव व स्थकत~~ वेळोवेळी होत असलेली वाढ या सर्वांचा विचार करुन दुरुस्ती खर्चाची प्रमाणीत मर्यादा रु.१,०००/- प्रति चौ.मी. पर्यन्त वाढविण्याची आज गरज भासली आहे. तसेच सन १९९५ च्या दुस-या [पावसाळी] अधिवेशनात मा. गृहनिर्माण मंत्री महोदय यांनी दुरुस्ती खर्चाची मर्यादा ही प्रती चौ.मी. १०००/- वाढविण्याची घोषणा केली आहे. सदर घोषणेला मंडळाने अनुमती दर्शविण्यास हरकत नाही असे वाटते. तरी आज सदर प्रस्ताव आपल्या मान्यतेसाठी सादर करण्यांत आला आहे. मंडळाने मान्यता दिल्यानंतर शासनास विनन्ती करण्यासाठी सदर प्रस्ताव प्राधिकरणाकडे पाठविण्यांत येईल.

याबर चर्चा करतांना मा. सदस्य श्री. घोपकर यांनी मा. सभापती यांना विनन्ती केली की, आजच्या कार्यसूचीमध्ये ज्या अंदाजपत्रकांना आपण सुधारित मंजूरी दिलेली आहे. त्यातील भाववाढ लक्षातघेता सदर मर्यादा १,००० ऐवजी १५०० प्रति चौ.मी. एवढी करण्यांत यावी. याबर मा. सभापती यांनी त्यांना अशी विनन्ती केली की, आपण याबाबतचा एक अहवाल मंडळास सादर करावा, त्याच्यावर योग्य तो निर्णय घेवून तसे शासनास पुढे कळविले जाईल.

...२३/..

चर्चेच्या ओघाओघात मा. सदस्यांनी मा. सभापतींच्या असे निदर्शनास आणून दिले की, महापालिकेचे अंशदान आहे, त्यात वाढ होणे जरूरीचे आहे. महानगरपालिकेकडे जी ६६ कोटीची उपकरापोटी वसुली होणारी थकबाकी आहे, त्याच्या वसुलीबाबत काय कार्यवाही करण्यांत येते किंवा येत आहे, याबाबत माहिती द्यावी.

यावर बोलताना मुख्य अधिकारी, दुवपु यांनी सांगितले की, याबाबत मागील आठवडयात महानगरपालिकेच्या आयुक्तांसमवेत एक बैठक आयोजित करण्यांत आली होती. सदर बैठकीस मा. सभापती सुध्दा हजर होते. या बैठकीत मा. आयुक्तांनी आश्वासन दिले की, उपकरापोटी जी रक्कम महानगरपालिकेकडे जमा होईल, त्याच्या ८०% भाग त्याच महिन्यात शासनाकडे पारित केला जाईल. सदर बाबत आणखी एक बैठक आयोजित करण्यांत येणार आहे, असे प्रतिपादन मुख्य अधिकारी, दुवपु यांनी केले. तसेच महानगरपालिकेकडून अंशदान हे गेली १२ वर्षे ३.६० कोटी एवढेच आहे, त्यात वाढ झालेले नाही. त्यासाठी महानगरपालिकेला वेळोवेळी पत्र पाठवून सदर अंशदानात वाढ करण्याविषयी विनन्ती केलेली आहे. तसेच शासनाकडून मिळणारे अनुदान १२ कोटी असून त्यातही वाढ करण्यास ~~त्यांची~~ विनन्ती केलेली आहे.

यावर बोलताना मा. सभापतींनी खुलासेवार सांगितले की, त्यांनी दुरुस्ती मंडळाचा कार्यभार सांभाळल्यावर महानगरपालिकेच्या आयुक्तांना पत्र पाठवून सदर बाबत पाठपुरावा केला, त्यास त्यांचेकडून चांगला प्रतिसाद मिळून ~~त्यांनी वर्षाअखेर मिळणा-या~~ महानगरपालिकेच्या अंशदानातून ३.६० कोटी वर्ष संपण्याअगोदरच १.८० कोटी मंडळास पारित केले आहेत. तसेच ३.६० कोटी अंशदान वाढवून १० कोटी करण्यासाठी प्रस्ताव महानगरपालिकेच्या स्थायी समितीपुढे ठेवण्यांत येत आहे. त्यांनी याबाबत बोलताना पुढे असेही नमुद केले की, म्हाडा ॲक्ट १९७६ कलम ९७ मध्ये सुध्दा तशी दुरुस्ती करणे जरूरीचे आहे. सदर विषयावर चर्चा करताना मा. सभापती/दुवपु यांनी सांगितले की, ~~आजच्या बैठकीत महानगरपालिकेचे~~ कर संकलक व निर्धारक विभागाचे

...२४/..

प्रमुख उपस्थित आहेत. त्यांनी त्यांना उपकरापोटी ६६ कोटीच्या थकबाकीबद्दल माहिती देण्यास सांगितले. तद्नुसार त्यांनी दिलेली आकडेवारी पुढील प्रमाणे आहे. उपकरातून सुट मिळण्याबाबतच्या प्रकरणामध्ये २४.६१ कोटी, वाढीव उपकरामुळे वाद निर्माण झाल्याने ४.७७ कोटी, कोर्ट केसमुळे ६.७० कोटी, कोट रिसीव्हर कडून येणे बाकी असलेले २.२४ कोटी, रिटेबल व्हॅल्यूतील वाढीत अडकलेली रक्कम ६४ कोटी, तसेच म्हाडाने ज्या मालमत्ता संपादित केलेल्या आहेत त्यापोटी ३.२८ कोटी, ज्या मालमत्ता तोडण्यांत आलेल्या आहेत त्यापोटी २.१४ कोटी मिळणे बाकी आहे. त्यांनी पुढे असेही सांगितले की, ज्या प्रकरणामध्ये भाडेकरु त्यांचे भाडे मालकास देतात, परन्तू मालक उपकराचे बील भरत नाही अशा मालमत्तांची कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करुन लिलाव करण्यांत येतो.

यावर मा. सभापती, दुवपु यांनी त्यांना सुचना दिल्या की, पुढील बैठकीत याबाबतची माहिती सादर करावी. तसेच महानगरपालिकेच्या आयुक्तांबरोबर झालेल्या बैठकीत ठरल्याप्रमाणे आतापर्यन्त किती रक्कम उपकरापोटी गोळा केली आहे व त्याचा ८०% भाग मंडळास पारित केला आहे किंवा कसे याबाबतची माहिती बैठकीत देण्यांत यावी.

सविस्तर चर्चेअंती दुरुस्ती खर्चाची मर्यादा ७५० वरुन १००० प्रती चौ. मी. करण्याबाबत तसेच महानगरपालिकेकडून मिळणा-या अंशदानात वाढ करण्याबाबत तसेच शासनाकडून मिळणा-या अनुदानात वाढ करण्याबाबत प्रस्ताव शासनास पाठविण्यासाठी प्राधिकरणास सादर करण्यास मंजूरी देण्याचे ठरले.

<u>ठराव क्र. ३२/ 231</u>

मुंबई शहरातील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीकरिता, दुरुस्ती खर्चाची मर्यादा रु. ७५०/- प्रति चौ. मी. वरुन रु. १०००/- प्रति चौ. मी. पर्यन्त वाढविण्याबाबत तसेच महानगरपालिकेकडून मिळणा-या अंशदानात वाढ करण्याबाबत तसेच शासनाकडून मिळणा-या अनुदानात वाढ करण्याबाबत प्रस्ताव शासनास पाठविण्यासाठी प्राधिकरणास सादर करण्यास मंजूरी देण्यात आली.

बाब टिपणी क्र. ३२/४

विषय- पुनर्रचित इमारतीमध्ये २२५ चौ. मी. चटई क्षेत्रफळाचे गाळे उपलब्ध करुन देण्याबाबत.

उपरोक्त विषयाची बाब टिपणी पृ.क्र. १८७ ते १९१ वर सादर करण्यात आली आहे. सदर विषयावर चर्चा करताना मा. सभापती यांनी शासनाने आधीच झोपडपट्टी-वासियांसाठी झोपडपट्टी पुनर्विकास योजनेखाली २२५ चौ.फू. चटई क्षेत्रफळाचे गाळे मोफत उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेतला आहे. परंतु गेली १०० वर्षे मुंबई बेटावर जेथ भाडेकरु १०० फूटा-पेक्षा कमी जागेत रहात आहेत त्यांना फक्त १८० चौ.फूटाच्या गाळयांच्या सदनिका पुनर्रचित इमारतीत मिळतात. तर त्यांनाही झोपडपट्टीवासियांसारखेच फायदे मिळण्याच्या उद्देशाने आज बाब टिपणी आपल्या मंजूरीसाठी सादर करण्यात आली आहे, अशी माहिती दिली. मागे एका कार्यक्रमामध्ये बोलताना मा. गृहनिर्माण मंत्री यांनी मुंबई बेटावरील जुन्या भाडेकरुंना/रहिवाशांना कमीत कमी २२५ चौ.फू. क्षेत्रफळाचे गाळे देण्याविषयी घोषणा केलेली आहे. मा. सभापती यांनी उपस्थितांच्या पुढे असेही निदर्शनास आणून दिले की, २२५ चौ.फू. क्षेत्रफळाचे गाळे भाडेकरुंस दिल्यास मंडळास अतिरिक्त उपलब्ध होणा-या गाळयांत घट येईल तरी मंडळास आज जो ३.१९२ चटई क्षेत्र निर्देशांक मिळतो तो वाढवून ४ चटईक्षेत्र निर्देशांक मिळणे जरुरीचे आहे व त्यासाठी शासन स्तरावर कार्यवाही चालू आहे. मा. सभापती यांनी पुढे असेही सांगितले की, पुनर्रचित इमारतीचे मालकी तत्वावर वितरण करण्यात यावे जेणेकरुन इमारतींचा खर्च वसुल होऊन हा निधी अन्य इमारतींच्या पुनर्बांधणीसाठी वापरण्यात येऊ शकेल. शासनाकडून सध्या दुरुस्ती व पुनर्बांधणीसाठी मिळणारे अनुदान १२ कोटीवरुन ५० कोटी मिळाल्यास पुनर्बांधणी कार्यक्रम प्रभावीपणे राबविणे शक्य

होईल. तरी आजच्या बैठकीमध्ये पुनर्रचित इमारतींमध्ये २२५ चौ.फूटाचे गाळे उपलब्ध करून देण्याविषयी बाब टिपणी मंजूरीसाठी सादर करण्यात आली आहे.

सविस्तर चर्चेअंती नवीन पुनर्रचित इमारतींमध्ये कमीत कमी २२५ चौ. फू. क्षेत्रफळाचे गाळे देण्याविषयीच्या प्रस्तावास मंजुरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक : ३२/ २३२

पुनर्रचित इमारतींमध्ये २२५ चौ. फू. चटई क्षेत्रफळाचे गाळे उपलब्ध करून देण्याच्या प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

बाब टिपणी क्रमांक : ३२/५

विषय- उपकरपात्र इमारतींना लावण्यात आलेल्या वर्गवारीत बदल करण्याबाबत.

उपरोक्त विषयाची बाब टिपणी पृ.क्र. ११२ ते ११७ वर सादर करण्यात आली आहे. सदर प्रस्तावावर चर्चा करताना मा. सभापती/ यांनी उपस्थितांच्या असे निदर्शनास आणून दिले की, उपकरपात्र इमारतींना म्हाडा अधिनियम १९७६ मधील कलम ८४ [१] नुसार लावण्यात आलेली वर्गवारी ही सन १९६९ मध्ये उपकरपात्र इमारतींचे जे आर्युमान होते त्यानुसार लावण्यात आली होती. सद्यस्थितीत या सर्व उपकरपात्र इमारतींचे आर्युमान २५ वर्षांनी वाढलेले आहे. "अ" वर्गातील उपकरपात्र इमारतींना शासनाच्या धोरणानुसार २ चटईक्षेत्र निर्देशांकाची सवलत मिळते तसेच भाडेकरूंना त्यांच्या इमारती मालकी तत्वावर १०० पट भाडे भरून मिळण्याची सवलत मिळते. सध्या ज्या इमारती "ब" आणि "क" वर्गात उपकरपात्र आहेत त्याही सद्यस्थितीत मोडकळीस

आलेल्या अवस्थेत आहेत. त्यांना "अ" वर्गात घोषित करणे जरूरीचे आहे. नाहीतर त्यातील रहाणा-या सामान्य भाडेकरू/रहिवाशांवर एक प्रकारचा अन्याय होईल. तरी सदर वर्गवारीत खालीलप्रमाणे बदल करण्यासाठी सदर प्रस्ताव बैठकीत सादर करण्यात आला आहे.

| अ. क्र. | वर्गवारी | बांधकामाचा कालावधी |
|---|---|---|
| १] | अ. | दि. ३१ डिसें. १९५० पूर्वी बांधण्यात आलेल्या इमारती. |
| २] | ब. | दि. १ जाने. १९५१ ते ३१ डिसेंबर १९६०. |
| ३] | क. | दि. १ जानेवारी १९६१ ते मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ कायदा १९६९ ज्या दिवशी कार्यान्वित झाला त्या दिवसापर्यंत. |

मा. सभापती यांनी पुढे असेही सांगितले की, वर सादर केलेल्या सुधारित वर्गवारीमुळे साधारणपणे २००० इमारतींचे बाबतीत वाढीव उपकर जमा होऊन दुरुस्ती व पुनर्बांधणी उपकरात वाढ होण्यास मदत होईल तसेच ज्या इमारती सध्या "ब" वर्गात आहेत त्या उपकरपात्र इमारती "अ" वर्गात घोषित केल्यामुळे शासनाने दि. २३.११.८९ रोजीच्या पत्रान्वये, पुनर्विकासाच्या योजनेस अधिक प्रोत्साहन मिळेल व पर्यायाने मंडळावरील उपकरपात्र इमारतींचा बोजा कमी होईल. वरील सविस्तर चर्चेअंती उपकरपात्र इमारतींच्या वर्गवारीत बदल करण्याच्या प्रस्तावास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

ठराव क्रमांक : ३२ / 233

मुंबई बेटावरील जुन्या उपकरपात्र इमारतींच्या वर्गवारीत खालील प्रकारे बदल करण्याच्या ठरावास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

| अ.क्र. | वर्गवारी | बांधकामाचा कालावधी |
| --- | --- | --- |
| १. | अ, | दि. ३१ डिसें. १९५० पूर्वी बांधण्यात आलेल्या इमारती. |
| २. | ब. | दि. १ जाने. १९५१ ते ३१ डिसेंबर १९६०. |
| ३. | क. | दि. १ जानेवारी १९६१ ते मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ कायदा १९६९ ज्या दिवशी कार्यान्वित झाला त्या दिवसापर्यंत. |

बाब क्रमांक : ३२/६

विषय- उत्तर परिमंडळातील विविध संक्रमण शिबीरांना मुलभूत सुविधा पुरविण्याबाबत.

उपरोक्त विषयाची बाब टिपणी पृ.क्र. १९९ ते २०३ वर सादर करण्यात आली आहे. विषयांकित प्रस्तावाची माहिती देताना मा.सभापती यांनी सांगितले की, मुंबई जिल्हा व उपनगरात विविध ठिकाणी २४ संक्रमण शिबीरे असून त्यात १७,८८९ गाळे आहेत. संक्रमण शिबीरांच्या देखभालीची व दुरुस्तीची कामे उत्तर परिमंडळामार्फतकेली जातात. संक्रमण शिबीरातील गाळ्यांची दुरुस्ती तसेच पाणी पुरवठा, मलनिस्सारण, गटारे, रस्ते इत्यादी सुविधा मिळणे व त्यांचा दर्जा वाढविणे आवश्यक झाले आहे व त्या दृष्टीकोनातून येत्या ४-६ महिन्यात करण्यात यावयाच्या कामांसाठी सुमारे १८२ लाख रुपये अंदाजे खर्च होणार आहे. सदर खर्च सन १९९६-९७ च्या आर्थिक वर्षात उपलब्ध करुन देण्याचे प्रस्तावित आहे. विविध संक्रमण शिबीरात कराव्या ... लागणा-या कामांची खर्चाची अंदाजे रक्कम सोबतच्या ...

तक्त्यात दिलेली आहे. तरी सदर प्रस्ताव आजच्या बैठकीत मंजूर करुन १९९६-९७ च्या अंदाजपत्रकात "संक्रमण शिबीराच्या विशेष दुरुस्ती निधी " या शिर्षकाखाली उपलब्ध करुन द्यावा व त्यास मंजूरी मिळण्यासाठी सदर प्रस्ताव सादर करण्यात आलाआहे.

विषयांकित प्रस्तावावर बोलताना ~~मा. सभापती~~ मा. सदस्य श्री विश्वास राव यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, आपण संक्रमण शिबीरासाठी बहुमजली इमारती बांधतो. त्यात १८० चौ. फू. क्षेत्रफळाचे गाळे देतो की, १६० चौ. फूटाचे गाळे देतो ? यावर खुलासा करताना संबंधीत अधिकारी श्री पालीवाल यांनी सांगितले की, संक्रमण शिबीरासाठी १६० चौ. फूटाचे गाळे बांधण्यात येतात. यावर मा. सदस्य श्री विश्वास राव यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, जून्या जागेमध्ये ज्यांचे गाळे मोठे असतात त्यांना एकच गाळा देण्यात येतो! यावर खुलासा करताना सहमुख्य अधिकारी/दु. व. पु. यांनी सांगितले की, एखाद्या भाडेकरुचे जून्या जागेचे क्षेत्रफळ २०० चौ. फू. पेक्षा जास्त असल्यास तसेच त्यामध्ये ८ पेक्षा जास्त माणसे रहात असल्यास त्याना संक्रमण शिबीरात उपलब्धतेनुसार २ गाळे वितरीत करण्यात येतात. सदर विषयाबाबत मा. सभापती यांनी सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयांची दखल घेऊन संक्रमण शिबीरांत जास्तीत जास्त चांगल्या प्रकारच्या सुविधा पुरविण्याच्या कामात लक्ष देण्यात येईल तसेच मा. सदस्य यांनी सुचविल्याप्रमाणे पुढील आठवड्यात मंडळाच्या विविध संक्रमण शिबीरांस भेट देऊन त्यातील रहिवाशांच्या/ भाडेकरुंच्या तक्रारी ऐकून त्यांचे निराकरण करण्याच्या दृष्टीने पावले उचलली जातील.

मुख्य अधिकारी, मुं. इ. दु. व. पु. मंडळ यांनी सांगितले की, संक्रमण शिबीरातील निगा योग्यप्रकारे होत नाही हे बरोबर आहे. परंतु निधीच्या कमतरतेमुळे तसेच कर्मचारीवर्गाची कमतरता लक्षात घेता जो निधी आज आपल्याकडे उपलब्ध आहे व जो कर्मचारीवर्ग आहे त्यानमुळे कामे बरोबर होत नाहीत हे तितकेच खरे आहे.

मा. सभापती यांनी उपमुख्य अभियंता, [ उत्तर] श्री राव यांना संक्रमण शिबीरांच्या तक्रारीचे व माननीय सदस्य यांनी सुचविलेल्या सूचनांची योग्य प्रकारे दखल घेऊन त्वरित कार्यवाही करण्याचे आदेश दिले. तसेच संक्रमण शिबीरांचा देखभाल विभाग कार्यक्षम असणे अत्यंत जरुरीचे असल्याचे निदर्शनास आणून दिले.

सविस्तर चर्चेअंती संक्रमण शिबीरांना मूलभूत सुविधा पुरविण्यासाठी अंदाजे रुपये १८२.१२ लाख विशेष निधी अंतर्गतच्या प्रस्तावास मान्यता देण्याचे ठरले.

ठराव क्रमांक : ३२/२३४
=================

मुंबई बेटावरील विविध संक्रमण शिबीरांना मुलभूत सुविधा पुरविण्याबाबतच्या प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

- - २९ -

बाब क्रमांक :- ३२.७
========

विषय :- उत्तर परिमंडळातील संक्रमण शिबिरांना संरक्षक भिंत बांधण्याबाबत.
-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-

वरील विषयाबाबतची बाब टिप्पणी पृष्ठ क्र. २०७ ते २१३ वर सादर करण्यांत आलेली आहे. सदर प्रस्तावावर चर्चा करतांना मा. सभापतींनी सांगितले की, मुंबई शहरात तसेच उपनगरात दुरुस्ती मंडळाच्या अखत्यारित विविध संक्रमण शिबिरे व त्यासहित मोकळे भूखंड आहेत. आणि त्यावर होणारी अनधिकृत बांधकामे थांबविण्याचे दृष्टीने तसेच सदर जागेच्या सुरक्षिततेसाठी संरक्षक भिंत बांधणे अपरिहार्य आहे. यावर मा. सदस्य श्री. विश्वासराव यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, सध्या जी अनधिकृत बांधकामे संक्रमण शिबिरात आहेत, त्यांना हटविण्याबाबतची कार्यवाही व्हावी. यावर खुलासा करताना मा. सभापती यांनी सांगितले की माननीय सदस्यांनी केलेल्या सुचनेशी ते सहमत आहेत. त्यांनी संबंधित अधिका-यांना याबाबत योग्य ती कार्यवाही करण्याचे आदेश दिले. मा. सभापतींनी उपस्थितांच्या असे निदर्शनास आणून दिले की, हया कामासाठी शासनाकडून आपल्याला निधी मिळणार आहे व त्याचा आपण पुरेपुर उपयोग करून घेतला पाहिजे. तसेच ज्या संक्रमण शिबीरांना संरक्षक भिंत बांधण्यांत येणार आहे त्यांची यादी पृ.क्र. २११ व २१३ वर देण्यांत आली आहे.

यावर चर्चा करतांना मा. सदस्यांनी संक्रमण शिबीरात पुरविण्यात येणा-या सुरक्षा रक्षणाबाबत मुद्दा उपस्थित केला. यावर खुलासा करतांना सहमुख्य अधिकारी श्री. झेंडे यांनी सांगितले की, सन १९८६ पासून मंडळाच्या संक्रमण शिबीरात दोन संस्थां मार्फत सुरक्षा व्यवस्था... पुरविण्यांत येत होती. त्यापैकी एक पाल नावाच्या संस्थेचे काम बरोबर होत नसल्या

निदर्शनास आले म्हणून त्या संस्थेची सुरक्षा काढुन घेण्यात आली आहे व त्यावर कार्यवाही चालू आहे. सद्यस्थिती मध्ये प्रायोगीत तत्वावर सहा महिन्यासाठी भांडुप सुरक्षा संस्थेस काम दिले आहे. संक्रमण शिबीराच्या सुरक्षा रक्षकाबाबत सदस्यांनी नापसंती व्यक्त केली. त्यांनी सांगितले की सुरक्षा रक्षकाचे काम बरोबर होत नाही त्यात सुधारणा होणे जरूरीचे आहे.

यावर बोलतांना मुख्य अधिकारी/दु. व पु. यांनी सांगितले की त्यांनी सर्व संबंधित अधिका-यांना जेव्हा जेव्हा संक्रमण शिबीरांना भेट घाल तेव्हा तेव्हा तेथे असलेल्या सुरक्षा रक्षकांच्या कामाची पहाणी करावी व त्यात काही आक्षेपार्ह आढळल्यास त्याचे नजरेस आणून देण्याच्या सूचना दिल्या आहेत

मा. सभापतींनी सन्माननीय सर्व सदस्यांच्या भावना लक्षात घेवून सहमुख्य अधिकारी/दु. व पु. यांना पुढील बैठकीत संक्रमण शिबीराच्या सुरक्षा रक्षकाबाबत माहिती सादर करण्यास सांगितले.

अनधिकृत बांधकामाबाबत बोलतांना मा. सदस्य श्री. उपकर यांनी त्यांच्या माहितीमधील माझगांव विभागातील ८-८ अ नवाब टँक रोड बाबत माहिती देतांना सांगितले की सदर मालमत्तेच्या भू संपादनाबाबत मंडळामार्फत कार्यवाही सुरु असतांना सदर मालमत्तेच्या घरमालकाने ती मालमत्ता एका गुंडाला विकली व त्याने तीथे तळ + २ मजल्याची इमारत बांधली आहे तरी त्याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

सविस्तर चर्चेअंती सर्वानुमते सदर प्रस्तावास मान्यता देण्याचे ठरले.

ठराव क्रमांक : ३२ / 235
=========

उत्तर परिमंडळातील संक्रमण शिबीरांना संरक्षक भिंत बांधण्यासाठी आर्थिक वर्ष १९९५-९६ या वर्षासाठी संक्रमण शिबीराच्या विशेष दुरूस्तीमध्ये रू. १००/- लाखाची जादा वाढ सुधारीत अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात व १३०.०१ लाख रूपये वाढ १९९६-९७ च्या अर्थसंकल्पात अंतर्भुत करणे तसेच प्रत्येक संक्रमण शिबीराच्या संरक्षक भिंतीच्या कामास रू. ६.००/- लाख रकमेपर्यंत विभागणी करून काम करण्यास शासनाकडून मिळणा-या निधीच्या अधिन राहून मंजूरी देण्यात आली.

बाब क्रमांक : ३२.८ [१]

विषय- इमारत क्र. १६, गोणावी वाडी या नावे ओळखली जाणारी २३-२५, मुगभाट स्ट्रीट, डी. विभाग, गिरगांव, मुंबई-४ येथील भूखंडावरील इमारतीसह नियोजित मंगल स. गृ. नि. संस्थेचे भूसंपादन करण्याचा प्रस्ताव.

उपरोक्त विषयाची बाब टिपणी पृष्ठ क्र. २१५ ते २२३ वर सादर करण्यात आली आहे. सदर प्रस्तावावर चर्चा करताना मा. सभापती यांनी सांगितले की, शासनाने सन १९८६ मध्ये "अ" वर्गातील उपकर पात्र इमारतीतील भाडेकरु एकत्र येऊन त्यांची गृहनिर्माण संस्था स्थापन करुन १०० पट मासिक भाडे घेऊन त्यांची इमारत मालकी तत्वावर देण्याचे धोरण स्विकारले आहे. त्यानुसार हा प्रस्ताव बैठकीसमोर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे. त्यांनी पुढे असेही सांगितले की, सदर इमारतीत एकूण ९ भाडेकरु असून त्यापैकी ८ भाडेकरुंची सदर योजनेस संमती आहे. सदर इमारतीची पहाणी उ.मु.अ. [द. ]/दुवपु यांनी संबंधित का.अ. व उप अभियन्ता, स. सं. क. यांच्या समवेत केलीअसून त्यांनी दिलेल्या अभिप्रायानुसार भाडेकरुंनी त्यांची इमारत स्वबळावर दुरुस्त करुन सुस्थितीत ठेवण्याचा नियोजित संस्थेचा उद्देश समर्थनिय आहे. यावर

...३४/..

~~अजून त्यांची व भाडेकरूंची सदर योजनेस संमती आहे. [illegible]~~
चर्चा करताना मा. सदस्य यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, जो एक भाडेकरु रहाणार आहे त्याची व्यवस्था कोण करणार? यावर खुलासा करताना मा. सभापती यांनी सांगितले की, सदर भाडेकरुची व्यवस्था करण्याची संपूर्ण जबाबदारी सदर नियोजीत संस्थेची आहे. चर्चेच्या ओघाओघात मा. सदस्य यांनी मा. सभापती यांना शासनाने सदर बाबत १९८६ साली अवलंबिलेल्या धोरणाच्या मार्गदर्शक पुस्तिकेची मागणी केली. याबाबत मा. सभापती यांनी सदर विभागाचे कार्यकारी अभियंता श्री मोहन्ना यांना सदर मार्गदर्शक पुस्तिका सन्माननीय सदस्यांना देण्याचे आदेश दिले.

सविस्तर चर्चेअंती सदर प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

ठराव क्रमांक : ३२/ २३६

इमारत क्र. १६, शेणावी वाडी या नांवे ओळखली जाणारी २३-२५, मुगभाट स्ट्रीट, डी. विभाग गिरगांव, मुंबई-४ येथील भूखंड व त्यावरील इमारतीसह नियोजीत मंगल स. गृ. नि. संस्थेच्या भूसंपादनाच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

बाब क्रमांक : ३२.८.[२]

विषय- इमारत क्र. ८७, प्लॉट नं. भाटीया बिल्डिंग, रानडे रोड, शिवाजी पार्क, दादर, मुंबई-२८, ग/उत्तर विभाग या मालमत्तेसाठी नियोजीत सागर महल स. गृ. नि. संस्थेसाठी प्राधिकरण कलम १०३-ब अन्वये भूसंपादनाचा प्रस्ताव.

उपरोक्त विषयाबाबतचा प्रस्ताव पृ. क्र. २२५ ते वर सादर करण्यात आला आहे. सदर प्रस्तावावर चर्चा करताना मा. सभापती यांनी सांगितले, की, सदर जुन्या

इमारतीत एकूण ६ रहिवाशी असून त्यापैकी ५ रहिवाशांची सदर प्रस्तावास संमती आहे. तरी सदर प्रस्ताव सन्माननीय सदस्यांच्या मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावातील पृ.क्र. २२९ वर १०३-ब अन्वये भूसंपादनाची करण्याची जरुरी नाही. असे चुकून टंकलेखित झालेले आहे. तरी सदर बाब ही मा. सभापती यांच्या निदर्शनास आणून त्यात चुकीची दुरुस्ती खालीलप्रमाणे करण्यात आली आहे. १०३-ब अन्वये भूसंपादन करण्याची जरुरी आहे.

सविस्तर चर्चेअंती सदर प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

ठराव क्रमांक : ३२ / 23८

इमारत क्र.८७, प्लॉट क्र. भाटीया बिल्डिंग, रानडे रोड, शिवाजी पार्क, दादर, ग/उत्तर या मालमत्तेसाठी नियोजीत सागर महल स.गृ. नि. संस्थेसाठी त्यांची इमारत स्वबळावर दुरुस्त करुन सुस्थितीत ठेवण्याच्यादृष्टीने संपादित करण्यास मान्यता देण्यात आली.

बाब क्रमांक : ३२/९

मा.अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी घ्यावयाचे विषय.

विषय- इमारत क्र.३४, दहावी गल्ली व ४३, अकरावी गल्ली, कामाठीपूरा, मुंबई या इमारतीची पुनर्बांधणी योजना.

उपरोक्त विषयाची बाब टिपणी मा.सभापती यांच्या परवानगीने उपमुख्य अभियंता [पुनर्रचना] यांनी सर्व सन्माननीय सदस्य यांना सादर केली. सदर प्रस्ताव चर्चा करताना मा.सभापती यांनी सांगितले की, सदर

भू-भागावर नवीन इमारत बांधण्याची योजना असून नवीन इमारतीत एकूण ११२ गाळे उपलब्ध होणार आहेत. तसेच जून्या भाडेकरूंना पुनर्वसित केल्यानंतर मंडळास ४२ गाळे अतिरिक्त मिळणार आहेत. तरी सदर योजनेस लागणारे रु. ५८.५० लाख एवढ्या खर्चास प्रशासकिय मंजूरी देण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

सविस्तर चर्चेअंती सदर प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

ठराव क्रमांक : ३२ / २२८

इमारत क्रमांक- ३४, दहावी गल्ली व ४३, अकरावी गल्ली, कामाठीपूरा, डी. विभाग, मुंबई या इमारतीची पुनर्बांधणी योजनेस अंदाजे येणा-या रुपये ५८.५० लाख एवढ्या खर्चास प्रशासकिय मंजूरी देण्यात आली.

तसेच मा. सदस्य श्री खोपकर यांनी मा. सभापती यांना एक लेखी निवेदन सादर केले. सदर निवेदनातील बाबीबाबत मा. सभापती यांनी संबंधीत अधिका-यांना सन्माननीय सदस्य यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयांबाबत माहिती लेखी स्वरूपात देण्याची सूचना दिली.

तद्नंतर सर्व उपस्थितांचे आभार मानून मा. सभापती यांनी आजची बैठकी संपल्याचे जाहिर करुन पुढील बैठक आगाऊ कळविण्यात येईल असे प्रतिपादन केले.

निवासी कार्यकारी अभियंता/
दु. व. पु.

मुख्य अधिकारी/दु. व. पु.

मा. सभापती/दु. व. पु.